
# लिंग समानता

डॉ. बळीराम पवार




संस्कृती प्रकाशन

Late Ramesh Warpudk... College
Ta. Sonpeth Dist. Parbhani

ISBN : 978-81-960127-7-9

• **लिंग समानता**

डॉ. बळीराम पवार

© संपादक 2023

• **प्रकाशक**

**संस्कृती पब्लिकेशन**
गायकवाड निवास, गणेश नगर, जुना औसा रोड,
लातूर, ता. जि. लातूर - 413512.

**मो नं - 9403163700**

• **अक्षर जुळवणी**

श्री. विकास ढमाले, श्री. अनंत कोटीवाले

• **मुखपृष्ठ**

श्री. चंद्रकांत कांबळे

• **मुद्रक**

ज्योतीचंद्र ऑफसेट प्रिंटींग अॅन्ड बायडिंग,
एल.आय.सी. कॉलनी, लातूर.

• **प्रथमावृत्ती : 1 एप्रिल 2023**

• **मुल्य 200/-**

---

**नोंद -** सर्व हक्क राखीव. या प्रकाशनाचा कोणताही भाग प्रकाशक आणि लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय, फोटोकॉपी, रेकॉर्डिंग किंवा इतर इलेक्ट्रॉनिक किंवा यांत्रिक पद्धतींसह कोणत्याही स्वरूपात किंवा कोणत्याही प्रकारे पुनरुत्पादित, वितरित किंवा प्रसारित केला जाऊ शकत नाही.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | ऐतिहासिक दृष्टिकोनातून महिला सबलीकरणचा एक अभ्यास<br>डॉ. शिवाजी अंभुरे | ०१ |
| २ | स्त्री भृणहत्या: कारणे व उपाय<br>डॉ. गणेश नथ्थुजी बहादे | ०८ |
| ३ | लिंगभाव असमानता आणि सामाजिक वास्तविकता<br>प्रा. डॉ. सुनिता टेंगसे | १५ |
| ४ | आदिवासी समाजातील लिंगभाव<br>प्रा. संजय जे. भगत | २३ |
| ५ | भारतातील आदिवासी महिला : लैंगिक असमानता आणि त्याचे परिणाम<br>कविता किसन भोये | २९ |
| ६ | लैंगिक समानता आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>प्रा. डॉ. सुरेश सखाराम भालेराव | ४५ |
| ७ | काम करण्याच्या ठिकाणी लैंगिक समानता आणि सद्यस्थिती<br>प्रा. डॉ. संबोधी एम. देशपांडे | ५२ |
| ८ | महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्त्री दास्य विमोचन संदर्भातले योगदान<br>डॉ. अर्चना राजकुमार कांबळे (जगतकर) | ५७ |
| ९ | महिला आणि कौटुंबिक हिंसाचार<br>डॉ. ज्योती अरविंद पोटे | ६५ |
| १० | महिला सक्षमीकरणाची वाटचाल<br>डॉ. गोरे प्रल्हाद आश्रुजी | ७८ |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | ऐतिहासिक दृष्टिकोनातून महिला सबलीकरणचा एक अभ्यास<br>डॉ. शिवाजी अंभुरे | ०१ |
| २ | स्त्री भृणहत्या: कारणे व उपाय<br>डॉ. गणेश नथ्थुजी वहादे | ०८ |
| ३ | लिंगभाव असमानता आणि सामाजिक वास्तविकता<br>प्रा. डॉ. सुनिता टेंगसे | १५ |
| ४ | आदिवासी समाजातील लिंगभाव<br>प्रा. संजय जे. भगत | २३ |
| ५ | भारतातील आदिवासी महिला : लैंगिक असमानता आणि त्याचे परिणाम<br>कविता किसन भोये | २९ |
| ६ | लैंगिक समानता आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>प्रा. डॉ. सुरेश सखाराम भालेराव | ४५ |
| ७ | काम करण्याच्या ठिकाणी लैंगिक समानता आणि सद्यस्थिती<br>प्रा. डॉ. संबोधी एम. देशपांडे | ५२ |
| ८ | महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्त्री दास्य विमोचन संदर्भातले योगदान<br>डॉ. अर्चना राजकुमार कांबळे (जगतकर) | ५७ |
| ९ | महिला आणि कौटुंबिक हिंसाचार<br>डॉ. ज्योती अरविंद पोटे | ६५ |
| १० | महिला सक्षमीकरणाची वाटचाल<br>डॉ. गोरे प्रल्हाद आश्रुजी | ७८ |


Late R... ACS College, Sonpeth, Ta. Sonpeth

Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# 1.

# ऐतिहासिक दृष्टिकोनातून महिला सबलीकरणचा एक अभ्यास

डॉ. शिवाजी अंभुरे
इतिहास विभाग
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ जि. परभणी

**प्रस्तावना:-**

समाज जीवनामध्ये स्त्रियांना फार महत्त्व आहे. स्त्री जीवनाचा अभ्यास केला तर आपल्याला स्त्रीची कहाणी. तिचे जीवन तिचे जगणे हे सारे पुरुषापेक्षा वेगळे दिसून येतात. दैनंदिन जीवनात स्त्रिया अगदी सहजतेने विविध भूमिका पार पडत असतात. स्त्रीला प्रेम करण्याची कन्या .तर कधी वास्तव माता तर कधी सक्षम सहचरणी अशा विविध भूमिका अत्यंत कौशलतेने आणि प्रेमाने निभावत असतात खरच स्त्रियांच्या बाबतीत असे म्हटले जाते की स्त्रियांचा एकदा प्रथम आईच्या पोटी जन्म होतो .नंतर लग्न झाल्यावर पुनर्जन्म होतो. आणि तिने बाळाला जन्म दिल्यानंतर चा तिसऱ्यांदा पुनर्जन्म होतो. स्त्रीचे लग्न झाल्यानंतर ती आपले माणसं. आई वडील आपला परिसर आपलं लहानपण सगळं सोडून नवीन ठिकाणी संसार थाटायला जाते. परंतु त्याही ठिकाणी ती अत्यंत उत्तमरीत्या सहजपणे संसार आनंदाने करत असते .परंतु आपल्या दुर्दैवाने प्राचीन काला मध्ये. मध्ये युगात काळा मध्ये. आधुनिक काळात स्त्रियांना वेगवेगळ्या कारणामुळे दुय्यम स्थान दिले आहे .स्त्रियांच्या बाबतीत अनेक वाईट रूढी. परंपरा निर्माण झाल्या. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार दिला नसून तिच्यावर केशवपन. पुनर्विवाह बंदी. देवदासी.प्रथा .सती प्रथा. जरठ विवाह. अशा अनेक वाईट परंपरा लादण्यात आल्या होत्या. अशा परिस्थितीतून स्त्रियांना बाहेर काढून काही समाज सुधारकाने स्त्रिया सबलीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. आणि स्त्रियांच्या मूलभूत अधिकार व हक्काबाबत शासनात व जनतेत जाणीव निर्माण करून देण्याचा प्रयत्न केला आहे

शोध निबंधाचा उद्देश:-

१) महिलांच्या स्थितीचा अभ्यास जाणून घेणे

२) महिला खरोखरच सबलीकरण झाल्या आहेत का याचा अभ्यास करणे

३) महिला विषयी समाजाची मानसिकता काय आहे याचा अभ्यास करणे

४) महिला विषयी शासनाची भूमिका याचा अभ्यास करणे

गृहीतके:-

१) आज सुद्धा महिलांना दुय्यम स्थान आहे

२) महिला विषयी समाजाची मानसिकता बदललेली दिसून येत नाही

३) महिला सबलीकरणाच्या कायद्यांची पूर्णपणे अमलबजावणी होत नाही

**महिला सबलीकरण व समाज सुधारक:-**

प्राचीन भारतातील स्त्री जीवन. मध्यम भारतातील स्त्री जीवन आणि समकालीन भारतातील स्त्री जीवन या कालखंडात महिला सबलीकरणास सुरुवात झालेली दिसून येते .कारण भारतीय इतिहासात स्त्री मुक्तीसाठी व स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी किंवा स्त्रिया वरील अन्याय दूर व्हावा यासाठी अनेक प्रवृत्ते.भाष्यकार. विचारवंत. समाज सुधारक. होऊन गेले आहेत. अगदी प्राचीन कालखंडाचा विचार केला तर भगवान गौतम बुद्ध महात्मा बसवेश्वर. छत्रपती शिवाजी महाराज. राजा राम मोहन राय. स्वामी दयानंद . दयानंद सरस्वती महात्मा ज्योतिबा फुले. गोपाळ हरी देशमुख गोपाळ. गणेश आगरकर .स्वामी विवेकानंद. छत्रपती शाहू महाराज. महात्मा गांधी. रघुनाथ धोंडो केशव कर्वे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर. राम मनोहर लोहिया सावित्रीबाई फुले पंडिता रमाबाई .यांनी महिलांमध्ये जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे स्त्रीमुक्ती आंदोलनात चालना या विचारात पुढे आली आहे महिलांची शैक्षणिक सामाजीकरण व सबलीकरण व्हावे हाच विचार पुढे आला आहे जेणेकरून स्त्रीशक्तीचा योग्य उपयोग होऊन त्याचा फायदा सामाजिक पुनर्बांधणीत होईल म्हणूनच देशाच्या ग्रामपंचायत पासून तर संसदेत महिलांना जास्तीत जास्त प्रतिनिधित्व देऊन त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय. अत्याचार . वाचा फोडण्यासाठी महिलांनी राजकीय. सामाजिक .शैक्षणिक .सबलीकरण झाले पाहिजे.

Late Ramesh Warpudkar ACS College, Sonpeth Pin-431516 Dist. Parbhani

**महिला सबलीकरणाचे ऐतिहासिक दृष्टिकोन:-**

प्राचीन भारतात भारताच्या इतिहास लेखनात चयाहूनवाद. राष्ट्रवादी. मार्क्सवाद.धर्मवाद. राजकीयवाद. परराष्ट्र धोरण. इत्यादी स्वरूपाचे लिखाण झाले आहे. परंतु भारतात १९७५नंतर वंचितांचा इतिहास लिहिण्यास सुरुवात झाली आहे या वंचित गटात भारतातील स्त्रिया .दलित. कामगार. शेतकरी. कारागीर. शेतमजूर. इत्यादीचा समावेश होतो. यात वंचित गटातील स्त्री हा घटक भारताचा नव्हे तर जगातील प्रत्येक राष्ट्रांमध्ये दुर्लक्षित राहिला आहे. १९९० नंतर भारतात स्त्रीवादी इतिहास लेखनास प्रारंभ झाला नंतर स्त्री सबलीकरणासाठी विशेष गती प्राप्त झाल्याचे दिसून येते. स्त्रीवादी इतिहास म्हणजे इतिहासाच्या सर्व कालखंडात स्त्रियांचे स्थिती .स्त्रियांचा दर्जा. स्त्रियांचे प्रश्न व त्यांचे योगदान यांचा अभ्यास करणे. असा सर्व समावेश अर्थ घेतला तर महिलांची सबलीकरण सहज शक्य आहे.

आजच्या गतिमान जीवनात व स्पर्धेच्या युगात विज्ञानाने मानवाच्या जीवनात अमूल्य क्रांती घडवून आणली आहे सर्व क्षेत्रांमध्ये फार मोठा बदल झाला आहे परंतु अजूनही असा एक घटक आहे समाजाला जातो तो घटक म्हणजे महिला होय समाजाचा विभाज्य भाग असल्यास स्त्रियांचे आर्थिक सामाजिक राजकीय शिक्षण आणि संविधानिक अस्तित्व पुरुषांच्या अस्तित्वापेक्षा खूपच आंदोलन दिसून येते त्यांच्या विकासासाठी आजपर्यंत अनेक योजना आल्या आणि गेल्या परंतु फारसा फरक झालेला नाही त्यांचे शिक्षण आरोग्य जीवनमान यात थोडाफार सुधारणा झाली आहे परंतु भारतीय माणसातील मानसिकता बदललेली नाही. त्यामुळे महिला विकासातील सहभाग नोंदवण्यासाठी त्यांचे सबलीकरण होणे गरजेचे आहे. किंवा सामाजिक.न्याय. आर्थिक. शैक्षणिक. क्षेत्रात महिलांचा सहभाग असणे सुद्धा फार आवश्यक आहे.

**महिला सबलीकरणाची संकल्पना व अर्थ:-**

महिला सबलीकरण ही संकल्पना नवीन नाही .ही सर्व समाजामध्ये विविध क्षेत्राबाबत याचा इतिहास उपलब्ध आहे .जागतिक स्तरावर महिला सबलीकरण क्षेत्राबाबत महिला सबलीकरणाबाबत विशेष चर्चा व कार्य मोठ्या प्रमाणात १९ व्या शतकात सामाजिक स्त्री विषयक चळवळीच्या माध्यमातून झाले आहे. भारत सरकारने २००१महिला सबलीकरण वर्ष

म्हणून घोषित केले व त्या दृष्टीने २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील हा महत्त्वाचा विषय बनला आहे. विं समाजाच्या निम्म्या भागात संबंधित महिला सबलीकरणासाठी ऐतिहासिक दृष्टिकोन विषयाचा अभ्यास हा कोणत्या अभ्यास क्षेत्राचा एक प्रमुख अभ्यास विशेष करणे हे क्रम प्राप्त झाले आहे .महिला सबलीकरणाचा अर्थ म्हणजे महिलाही आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र. स्वतः निर्भर व स्वावलंबी असणे. असा होय तिला स्वतःबद्दल सकारात्मक दृष्टिकोन असावा जेणेकरून कोणत्या विपरीत परिस्थितीला सामोरे जाता येईल. महिला विकास कार्यात सहभागी होण्यास पात्र ठरेल निर्णय निर्धारण प्रक्रिये सहभागी होऊ शकेल याकरिता शिक्षण हा सबलीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण भूमिका वजावणार आहे.

**महिला सबलीकरणात शासनाची भूमिका:-**

महिलांचे सबलीकरण करण्यासाठी शासनाने अशा महिलांना स्वतःच्या उभे करण्यासाठी विविध योजना व कार्यक्रम आखून त्या मार्फत स्वय रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे .यातून महिला आपला आर्थिक. सामाजिक. राजकीय. सांस्कृतिक व शैक्षणिक विकास करू शकते व संपूर्ण समाजामध्ये न्याय प्रस्थापित होईल. महिलांना अन्न. वस्त्र. निवारा. मालमत्ता. मुलं होऊ देणे अथवा न होऊ देणे सामाजिक सुरक्षिता .आरोग्याची काळजी आणि नोकरी याचा अधिकार तसेच महिलांना राजकीय आणि धार्मिक स्वातंत्र्य गुलामगिरीतून मुक्ती .शिक्षण घेणे नागरिकांचे दिवाणी विशेष हक्क तसेच सर्व प्रकारच्या अत्याचारातील मुक्ती मिळवून देणे व त्यांना हक्क मिळवून देणे अशा हक्कांच्या माध्यमातून महिलांची सबलीकरण साधने महिला हक्काचे अंतिम उद्दिष्ट आहे स्त्रियांचे सबलीकरण ही आजच्या युगाची आवश्यकता आहे म्हणून महिला सबलीकरणाला भारता सह नवीत संपूर्ण जगात सुरुवात झाली आहे .भारतामध्ये महिला सबलीकरणाचा प्राथमिक उद्देश आणि ग्रामीण व शहरी भागातील महिलांची शैक्षणिक सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारणे आरोग्य विषयक सोयी सुविधा उपलब्ध करून देणे हा भारतीय राज्यघटनेमध्ये महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी घटनात्मक तरतुदी करण्यात आल्या आंतरराष्ट्रीय स्तरावर ८ मार्च हा दिवस जगभर आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो. १९७५ या आंतरराष्ट्रीय महिला वर्षी म्हणून भारतात व इतर देशा मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आले आहे.१९७५ ते १९८५ आंतरराष्ट्रीय महिला दशक हे अवघ्या जगात कार्यक्रम योजना

संबंधित त्याच्या नवीन उपक्रमामुळे साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले, भारतात 1995 नंतर महिलांच्या समस्येची उत्तर शोधण्याच्या दृष्टीने नवीन कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे.

**महिला सबलीकरणाच्या दृष्टीने जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर भारताची स्थिती:-**

जागतिक स्तरावर महिला सबलीकरणाची सुरुवात राष्ट्रघाने केली आहे. कारण इ.स. १९४५मध्ये स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व राष्ट्रसंघाने कायदेशीर मानले आहे नंतर १९७५मध्ये मेक्सिको येथे झालेली पहिली जागतिक परिषद आणि या परिषदेपासून ८ मार्च जागतिक महिला दिवस साजरा करण्यात येणार आहे असं जाहीर करण्यात आले. यानंतर१९७५ते १९८५ हा कालखंड महिला विकास दशक म्हणून जागतिक स्तराव साजरा करण्यात आले. त्या दृष्टिकोनातूनच भारत सरकारने महिला सबलीकरणासाठी लोक कल्याणकारी राज्य प्रणालीचा अंगीकार करून प्रत्येक नागरिकाच्या जीवित वित्ताची सुरक्षिता महत्वाची मानली. त्यासाठी स्त्री -पुरुष समानता कायदा. किमान वेतन कायदा. समान वेतन कायदा. सतीबंदी कायदा. पुनर्विवाह कायदा. वारसा हक्क कायदा. इत्यादी स्त्री हक्क संरक्षण कायदे पास करण्यात आली. १९९० च्या राष्ट्रीय महिला कायदा १९९१ चा राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना. १९९५मधील महाराष्ट्र राज्याचे स्वातंत्र्य महिला धोरण व २००१ चे महिला समक्षता व समदक्षता वर्षे महिला सक्षमीकरणाच्या वाटचालीतील फार मोठे महत्त्वाचे सुवर्णक्षण आहेत या वरील कायद्यानुसार भारतीय स्त्री जीवनाचा कायापालट होऊन महिला सक्षम करण्याचे प्रयत्न यशस्वी झाल्याचे दिसून येतात. मात्र गरीब महिलांना सक्षम करण्याचे प्रयत्न वर यशस्वी दिसत असले तरी अंतरंगात हे प्रयत्न महिलांचे माणूस म्हणून सक्षम करून आणण्यास फारशी यशस्वी झाले नाहीत असे देखील म्हटल्या जातो कारण आज सुद्धा शंभर टक्के महिला सबलीकरण झाल्याचे दिसून येत नाही.

**महिला सबलीकरणाचे घटक किंवा उपाय:-**

१) महिला वरील अत्याचाराचे निराकरण करणे

२) महिलांचा आर्थिक दर्जा सुधारणे व साठी रोजगार निर्मिती करणे

३) महिलांच्या शैक्षणिक धोरणाला प्रोत्साहन देणे

४) प्रचार माध्यमाच्या वापराद्वारे महिलांचे शैक्षणिक हक्क प्राप्तीसाठी जनजागृती करणे

५) प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षण व केंद्रीय निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढविणे

६) दलित आदिवासी स्त्रियांचे शिक्षणातील प्रमाण वाढविणे

७) महिलांना जागतिकीकरणाच्या सेवा सुविधा पुरविणे

**समारोप:-**

वरील प्रस्तुत शोधनिबंधात  महिलांच्या सबलीकरणात शैक्षणिक अधिकाराची संविधानात्मक तरतूद असून देखील प्रगत देशाच्या तुलनेतभारतीय महिलांची शैक्षणिक सबलीकरण व पाहिजे त्या प्रमाणात वाढला नाही असे मला वाटते कारण आज सुद्धा भारतीय समाजावर परंपरागत विचाराचा पगडा दिसून येतो त्यामुळे शैक्षणिक सबलीकरणाच्या प्रक्रियेत महिला मागे आहेत तेव्हा महिलांचे सबलीकरण व्हायचे असेल तर प्राथमिक शिक्षण उच्च शिक्षण प्रौढ शिक्षणापर्यंत महिलांचा सहभाग करून घेणे आवश्यक आहे .आज आपण महिला सबलीकरण च्या बाबतीत महिला सबलीकरण झाल्याचे बोलतो परंतु महिला वरील शारीरिक मानसिक शोषणाचे प्रमाण आज वाढत आहे .कारण महिलांच्या सबलीकरणाचे इच्छाशक्तीची कमतरता व त्याच्या व पुरुषाकडून झालेले दमन या गोष्टी आपल्याला दिसून येतात आज सुद्धा भ्रूणहत्या. शिशुकन्या हत्या महिला आयोगाची हेडसांड. हुंडाबळी. लैंगीक अत्याचार कौटुंबिक हिंसा. शिक्षणामुळे होणारे हेळसांड व स्त्रिया वरील अनेक वाईट रूढी. परंपरा दिसून येतात त्याचे सर्वच कारण स्त्रियांना आज  सुद्धा दुय्यम समजत आहेत .महिला सबलीकरण खरंच करायचे असतील तर आपल्याला प्रत्येक माणसांना आपली मानसिकता बदलून महिलांना जे कायद्याने स्वातंत्र्य आहे ते स्वातंत्र्य बहाल करण्याची आवश्यकता आहे.

संदर्भ ग्रंथ:-

१) आढाव विलास:-महिला सबलीकरण. प्रौढ निरंतर शिक्षण, व, ज्ञान विस्तार विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.
२) देसाई संभाजी:-महिला सबलीकरण प्रशांत पब्लिकेशन
३) सिंह निशांत:-भारतीय महिला एक सामाजिक अध्ययन
४) लोखंडे धनंजय:-महिला सबलीकरण विशेप अंक वर्पे एप्रिल २००२मार्च २००३

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Tq. Sonpeth Dist. Parbhani Pin-431516

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani